


सोलापूर महानगरपालिका
कामगारकल्याण जनसंपर्क
विभाग



# २६ नोव्हेंबर शहीद दिनानिमित्त दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन

Volume XI Issue 17 Date 26-11-2023

सोलापूर महानगरपालिकेचे वतीने दि २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले भारताचे थोर सुपूत्र व सोलापूरचे माजी पोलीस आयुक्त अशोक कामटे, मुंबईतील ए.टी.एस. पथकाचे प्रमुख पोलीस अधिकारी हेमंत करकरे, चकमक फेम गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळस्कर सोलापूरातील राज्य राखीव पोलिस गट १० चे जवान राहुल शिंदे .एन.एस.जो. मधील मेजर संदीप उन्नीकृष्णन हे शहीद झाले होते त्यांचा आदर्श व त्यांची स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस शहीद दिन म्हणून साजरा करण्यात येतो.महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील मा. आयुक्त यांचे कार्यालयात त्यांचे प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी विभागीय अधिकारी महबूब शेख, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे,क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, प्रकाश सावंत,विक्रम पाटील, एजाज शेख, सचिन पोरे सिद्धू तिमीगार आदी मान्यवर उपस्थित होते.

